दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com   lakshamaha.dhule@gmail.com   lakshamaha.nsk@gmail.com   RNI No.MAHMAR/2019/79184

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ६५ वा ▶ मंगळवार दि.९ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर...   खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला
संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### ट्रॅक्टरखाली दबून चालक ठार

**शहादा ।** भरधाव ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटल्याने रस्त्यालगत उलटून ट्रॅक्टरखाली दाबला जाऊन चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नांदरडा ते करणखेडा दरम्यान शनिवारी दुपारी घडली. किसन जेरमा वसावे, रा. काथर्दा दिगर असे या मृत चालकाचे नाव आहे. तालुक्यातील काथर्दा दिगर येथील किसन जेरमा वसावे हे कारखान्यातून ऊस खाली करून येत होते. नांदरडा ते करणखेडा दरम्यान भरधाव वेगातील ट्रॅक्टर (क्र. एमएच ३९ एफ ३७२९) रस्त्यालगत उलटले. या अपघातात ट्रॅक्टरखाली दाबले गेल्याने किसन जेरमा वसावे यांचा जागीच मृत्यू झाला.

### ट्रॅव्हल्समध्ये महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**धुळे ।** खाजगी ट्रॅव्हल्समध्ये मालेगाव ते धुळे प्रवासादरम्यान प्रवासी महिलेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करुन तिचा विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात ट्रॅव्हल्समधील वाहकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात, देवपुरातील कस्तूरबानगरात राहणारी २६ वर्षीय महिला दि.६ रोजी मुंबई श्रीणेश ट्रॅव्हल्स् बस (एमएच ०९ / ईएम ०४५० ) ने मालेगाव येथून धुळ्याकडे येत असतांना सकाळी ८.२० ते ९ वाजेच्या दरम्यान, शहरातील बारा पत्थरदरम्यान, ट्रॅव्हल्समधील वाहक (क्लिनर) किशोर छगन पाटील रा. खाजोळ ता.पाचोरा, जि. जळगाव, याने महिलेशी कोणत्याही प्रकारे ओळख नसतांना महिलेच्या इच्छेविरुध्द वारंवार जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. तसेच परिचय वाढविण्यासठी पाठलाग केला, अशी फिर्याद पिडीत दिली आहे.

# नाशिकमध्ये एकनाथ शिंदेंसमोर अंगणवाडी सेविकांचा गोंधळ

### पोलिसांनी दोन कर्मचाऱ्यांना घेतले ताब्यात

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



#### मागण्या काय?

**सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार शासकीय कर्मचारी घोषित करा. वेतनश्रेणी, ग्रॅच्युईटी, भविष्य निर्वाह निधीसह इतर लाभ द्यावेत. दरमहा २६ हजार रुपये मानधन देण्यात यावे. सेवा समाप्तीनंतरच्या पेन्शनचा प्रस्ताव अधिवेशनात मंजूर करा. अंगणवाड्यासाठी मनपा हद्दीत ५ हजार ते ८ हजार भाडे मंजूर करावे. आहाराचा दर बालकांसाठी १६ तर अतिकुपोषित बालकांसाठी २४ रुपये करावा.**

#### अंगणवाडी सेविका आंदोलनावर ठाम

**विविध प्रलंबित मागण्यासाठी बुधवारी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्ताने मुंबईतील आझाद मैदानावर अंगणवाडी सेविकांनी आंदोलनाला सुरुवात केली. अंगणवाडी सेविकांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी आणि आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आंदोलनकर्त्या अंगणवाडी सेविकांच्या शिष्टमंडळाची भेट झाली. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेत कोणतेही चांगले पाऊल उचलले गेले नसल्याचा आरोप अंगणवाडी सेविकांनी केला. तसेच, मुख्यमंत्र्यांसोबतच्या चर्चेनंतरही अंगणवाडी सेविका आंदोलनावर ठाम असून आज दुसऱ्या दिवशीही आंदोलन सुरूच ठेवणार आहेत.**

राष्ट्रीय युवा महोत्सवाचा मान यंदा नाशिकला मिळाला आहे. १२ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तपोवन येथील मैदानावर महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. यानिमित्त तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी नाशिकमध्ये दाखल झाले. नाशिकमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी गोंधळ केल्याची घटना घडली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोरच अंगणवाडी सेविकांना टाहो फोडला. मात्र पोलिसांनी अंगणवाडी सेविकांना मुख्यमंत्री शिंदे यांना भेटण्यास मज्जाव केला. त्यामुळे काही महिला सुरक्षेच कड तोडून मुख्यमंत्र्यांच्या जवळ गेल्या. यावेळी पोलिसांना महिलांना ताब्यात घेतले. काही वेळाने त्या महिलांना सोडून देण्यात आले. मुख्यमंत्री शिंदे हे नाशिकमध्ये मोदींच्या सभेच्या तयारीचा आढावा घेत होते. त्यावेळी दोन अंगणवाडी सेविका त्यांच्यासमोर आल्या. त्यांनी टाहो फोडत मुख्यमंत्र्यांना आपल्या वेदना सांगण्यात प्रयत्न केला. याचा व्हिडिओही समोर आला आहे. ज्यामध्ये या दोन्ही अंगणवाडी सेविका ढसाढसा रडत आपल्या मागणी मुख्यमंत्री शिंदेंना सांगताना दिसत आहे. अंगणवाडी सेविकांनी गोधळ घाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना बोलावून घेतलं. त्यांचं म्हणणं ऐकलं. यानंतर जेव्हा ते तिथून निघत होते, त्यावेळी पुन्हा या दोन अंगणवाडी सेविकांनी रडत त्यांना आपल्या मागण्या सांगण्यास सुरुवात केली. यात व्हिडिओमध्ये मुख्यमंत्री तिथून निघत असताना एक अंगणवाडी सेविका रडत ओरडत म्हणाली की, ''साहेब आमच्या मागण्या मान्य करा. खूप दिवस झाले , आम्ही उपाशी आहोत.'' दरम्यान, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा, सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी आदी मागण्यांसाठी राज्यातील अंगणवाडी कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. शासनाने अद्याप अंगणवाडी सेविकांच्या मागण्यांबाबत कोणताच निर्णय जाहीर केलेला नाही.

# नकाणे तलाव पुन्हा कोरडा पडणे, हे धुळेकरांचे दुर्दैव : मा. आ. अनिल गोटे

**धुळे । प्रतिनिधी**



नकाणे तलाव कोरडा पडल्याने माजी आमदार अनिल गोटे यांनी सत्ताधारी भाजपावर निशाणा साधला आहे. तब्बल २४ वर्षांनंतर नकाणे तलाव कोरडा होणे हे धुळेकरांचे दुर्भाग्य असल्याचे गोटेंनी म्हटले आहे. मस्तवाल सतारूढ पक्षाने धुळेकरांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न गांभीर्याने न घेतल्याने ही वेळ आल्याचे म्हटले आहे.

यासंदर्भात गोटेंनी एक पत्र प्रसिद्धीस दिले आहे. पत्रकात अनिल गोटेंनी म्हटले आहे की, आज नकाणे तलावाची अवस्था १९९९- २००० वर्षासारखी झाली आहे. तेव्हा धुळे शहराला सलग २९ दिवस पिण्यासाठी पाणी मिळाले नव्हते. त्यातून मार्ग काढण्याकरीता मी एक्सप्रेस कॅनॉल निर्मिला. प्लास्टीकचा कागद आंथरून ऐन मे महिन्यात नकाणे तलाव पूर्ण भरून ओसंडून वाहत असतांना समस्त धुळेकरांनी बघितले. तेव्हा जलपुजनासाठी धुळेकरांची उत्स्फूर्त गर्दी लोटली होती. विशेष म्हणजे राज्य शासनाने सदर एक्सप्रेस कॅनॉलसाठी व सैय्यदनगर बंधारा ते नकाणे तलाव नैसर्गिक उताराने पाणी आणण्याकरीता १ कोटी ५३ लाख रुपये एका रकमेत दिले होते. मी दिवसरात्र काम करून ९० दिवसांचे काम ४५ दिवसांत पूर्ण केले. शिवाय हे काम १ कोटी २५ लाखांत उरकले. उर्वरित २८ लाखांची रक्कम तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांना सुपूर्द करण्यात आली होती; असा उजाळाही अनिल गोटेंनी दिला. तेव्हापासून एक्सप्रेस कॅनॉल स्वच्छ करण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर सोपविण्यात आली होती. पण दिल्ली पासून धुळ्यापर्यंत सत्तेच्या मस्तीत आणि धुदींत असलेला सत्तारूढ भाजपाला धुळेकर जनतेच्या पिण्याच्या पाण्याशी काहीही घेणेदेणे नव्हते व नाही. विकासाच्या नावावर रस्त्यावर डांबराचे पट्टे मारणे, निकृष्ट दर्जाचे काँक्रीटीकरण करणे, विकासाच्या नावावर स्वतःच्या तुंबड्या भरून घेणे एवढ्या एका कार्यक्रमात सर्व नेते मशगूल होते. केवळ आणि केवळ अक्कलपाडा धरणातून पाणी येणार आहे; या एका आशेवर धुळेकरांना ५ वर्ष झुलवत ठेवले. वास्तवित, ही योजनाही सदोष आहे; याचाही लवकर भांडाफोड करणार असल्याचे गोटेंनी म्हटले आहे. अशा आशयाचे पत्रक लोकसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार अनिल गोटे यांनी प्रसिध्दीस दिले आहे.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा ; पाच जण ताब्यात

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

पवन नगरात काल रात्री साडेअकराच्या सुमारास चाळीसगावरोड पोलिसांनी छापा टाकून पाच जुगार्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत जुगार्यांच्या ताब्यातील ५३ हजार ३०० रूपयांची रोकड जप्त करण्यात आली. यातील म्होरक्यासह त्यांच्या साथीदारांचा तपास सुरू आहे.

चाळीसगावरोड पोलीस ठाण्याच्याहद्दीतील पवन नगरातील महादेव मंदिराजवळ एका पडक्या घराच्या आडोशाला काही इसम जुगार खेळत असल्याची माहिती चाळीसगावरोड पोलिसांना मिळाली. त्या अनुषंगाने पोहेकॉ पाथरवट यांनी पथक व पंचासह सदर ठिकाणी जावुन पहाणी केली असता काही इसम जुगार खेळतांना आढळून आले. पोलिसांची चाहुल लागताच काही जणांनी पोबारा केला. तर पथकाने आकाश प्रविण सोनवणे, रा.सहजीवन नगर, धुळे, जमीन रशीद अन्सारी, रा.स्लॉटर हाऊस मागे, धुळे, अश्पाक गुलाब सैय्यद, रा.जामचा मळा, धुळे, आयाज लतीफ शेख, रा.पवन नगर, धुळे यांना ताब्यात घेतले.

# मुंबईचे स्पेशल आयजी अब्दूल रहेमान यांची पत्रकार भवनास सदिच्छा भेट



### पदाधिकारींचा सत्कार करून लायब्ररीची केली प्रशंसा

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

समाजातील सर्व घटकांना संधी व न्याय मिळेल अशी लोकशाही राज्यव्यवस्था निर्माण करण्यात लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारितेचा महत्वपूर्ण वाटा असतो. त्यामुळे प्रसारमाध्यमांनी आपली जबाबदारी पार पाडताना समाजाच्या संरचनेतील घटकांना स्थान देऊन त्यांचे एकूणच जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. समजतील सर्वच स्तरातील जनता रिफ्लेकट करण्याचा प्रयत्न माध्यमांनी केला तर खरी लोकशाही रुजेल असे स्पष्ट मत मुंबईचे स्पेशल आयजी तथा धुळे जिल्ह्याचे कर्तव्यकठोर माजी पोलीस अधीक्षक अब्दूल रहेमान यांनी धुळ्यात व्यक्त केले.

अब्दूर रहेमान सोमवार दिनांक ८ जानेवारी रोजी धुळ्यात आले असता त्यांनी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनास सदिच्छा भेट दिली. एनआरसी कायद्याच्या विरोधात राजीनामा का दिला असे विचारले असता अब्दूर रहेमान म्हणाले की, एनआरसी कायदा हा ज्यांच्याकडे स्वतःची जमीन नाही त्यांना नागरिकत्व नाकारतो, जर नागरिकत्व मान्य केले तर त्यांना निवडणूक लढण्यास प्रतिबंध करतो. देशातील दलित, आदिवासी, भटके, विमुक्त, ओबीसी, अल्पसंख्यांक अशा प्रवर्गातील स्वतःची मालकीची जमीन नसलेल्या नागरिकांची संख्या ही खूप मोठी आहे. अशा नागरिकांना नागरिकत्वाच्या अधिकारापासून एनआरसी कायदा वंचित ठेवतो. यामुळे चुकीचा कायदा राबविणाऱ्या यंत्रणेचा भाग मी असू नये म्हणून प्रशासनाकडे राजीनामा सादर केला आहे. तो इन प्रोसेसमध्ये असल्याचेही अब्दूर रहेमान म्हणाले. यावेळी त्यांच्यासोबत सामाजिक कार्यकर्त्या नाजनीन शेख उपस्थित होत्या. अब्दूल रहेमान यांनी पत्रकार संघाच्या सभागृहातील ग्रंथसंपदा पाहून त्याविषयी माहिती जाणून घेत लायब्ररीच्या नीटनेटकेपणाची प्रशंसा करीत पत्रकार संघाची कामगिरी सतत उंचावत राहो अशा शुभेच्छाही दिल्या.

यावेळी अब्दूर रहेमान यांनी स्वलिखित व प्रकाशित 'पॉलिटिकल एक्सलुजन ऑफ इंडियन मुस्लिम' हे पुस्तक व बुके भेट देऊन पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, सचिव सचिन बागुल, कोषाध्यक्ष तुषार बाफना, प्रांतिक प्रतिनिधी प्रकाश शिरसाठ, कार्यकारिणी सदस्य जमील शाह, आकाश सोनवणे, दीपक शिंदे, पत्रकार पुरुषोत्तम गरुड यांचा सत्कार करून शुभेच्छा दिलया.

# प्रशासकीय इमारत कामाचा आ. शाहंच्या हस्ते शुभारंभ

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने धुळे औद्योगिक वसाहतीत प्रशासनाचे काम सुलभ व्हावे म्हणून आ.फारुख शाह यांच्या प्रयत्नाने प्रशासकीय इमारत बांधणे या कामासाठी दहा कोटी बारा लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाचा शुभारंभ सोमवार दिनांक ८ जानेवारी रोजी आ.फारुख शाह यांच्या शुभहस्ते करण्यात आला. धुळे औद्योगिक वसाहत मोठ्या प्रमाणात विकसित होत असून तसेच नरडाणा औद्योगिक वसाहत सुद्धा चांगल्या प्रकारे विकसित होत आहे.

या औद्योगिक वसाहतीत उद्योजकांच्या वेगवेगळ्या समस्यांसाठी त्यांना नाशिक व जळगाव येथे जावे लागत होते. ही समस्या धुळे जिल्ह्यातील उद्योजकांनी आ.फारुख शाह यांच्याकडे मांडली. त्यांच्या या निवेदनाचा विचार करता आ.फारुख शाह यांनी उद्योग मंत्री सावंत यांच्याकडे मागणी केली व यासाठी दोन वर्ष पाठपुरावा केला. या मागणीचा विचार करून उद्योग मंत्र्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने धुळे औद्योगिक वसाहतीत प्रशासकीय इमारतीसाठी दहा कोटी बारा लक्ष रुपये मंजूर केले. या इमारतीमुळे धुळे जिल्ह्यातील उद्योजकांना मोठ्या प्रमाणात प्रशासकीय कामासाठी सोयीचे होईल तसेच उद्योजकांचे व प्रशासनातील अधिकार्यांचे काम सुलभ होणार असून आता उद्योजकांना जळगाव नाशिक मुंबई येथे न जाता धुळे येथेच आपले काम मार्गी लागतील. यामुळे उद्योजकांना होणारा त्रास वाचणार आहे. शुभारंभप्रसंगी आ.फारुख शाह यांचे सोबत भिखनहाजी शाह, डॉ. दिपश्री नाईक, निजाम सैय्यद, इकबाल शाह, डॉ.बापुराव पवार, आसिफ शाह, हारूण खाटीक, सउद आलम, सलमान खान, रियाज शाह, समीर शाह, फैसल अन्सारी आदी उपस्थित होते.

# विझलेल्या मशालींचा उजेड पडत नाही: मुख्यमंत्री शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर घणाघात

**मुंबई ।** हा प्रभु रामाचा धनुष्यबाण, शिवसेनेचा धनुष्यबाण, बाळासाहेबांचा धनुष्यबाण आपल्याकडे आहे. खरी शिवसेना आपल्याकडे आहे. खोट्याच्या कपाळी गोटा हे खरं आहे, हे कोकणी माणसं येत्या निवडणुकीत खरं करतील. विझलेल्या मशालींचा उजेड पडत नाही हे सर्वांना माहित आहे. आम्ही तत्वांशी लढाई केली. मला काय मिळेल यापेक्षा राज्याला, शिवसेनेला काय मिळेल याचा विचार आम्ही केला, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. मुंबई, ठाणे शिवसेनेचे शरीर असलं तर सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी हे शिवसेनेची दोन फुफ्फुसं आहेत. शिवसेना, मोठी झाली आणि वाढली. या कोकणी माणसाने शिवसेनेला ऑक्सिजनचा पुरवठा केला आहे, असं म्हणत एकनाथ शिंदे यांनी कोकणी माणसांचं कौतुक केलं.

# डॉ.विजयकुमार गावित परिवाराविरोधात सर्वपक्षीयांची एकजूट

**नंदुरबार । प्रतिनिधी**

राजकीय शालजोडे बाहेर काढून नंदुरबार जिल्हा विकास मंचच्या (नंदुरबार डिस्ट्रीक्ट डेव्हलपमेंट फोरम) मुहुर्तमेढसाठी व्यासपीठावर आलेल्या सर्वपक्षीय नेत्यांनी जिल्हा विकासाचा सूर आवळतांनाच जिल्ह्यातील सत्तेचा केंद्रबिंदु असलेले आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित परिवारास लक्ष्य केले. एकच परिवार जिल्ह्याचा विकास करत असल्याचा आभास निर्माण करणाऱ्यांविरोधात काम करण्यासह थेट गावित परिवाराविरोधात रणशिंग फुंकण्याचे काम या व्यासपीठावरुन झाले आहे. लोकसभा निवडणूक जवळ आली असताना ही घडामोड झाल्याने गावित परिवाराच्या अडचणी वाढल्या आहेत.

नंदुरबार जिल्ह्याच्या निर्मितीस २५ वर्षे झाले असले तरी अनेक प्रश्न अजूनही जसेच्या तसे आहेत. हे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी नंदुरबार जिल्हा विकास मंचची मुहुर्तमेढ रोवली. सर्वपक्षीय नेत्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी या मंचमध्ये एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. जिल्ह्याच्या विकासाचा एकाच परिवारावर किती बोजा टाकणार, असा उपरोधात्मक टोला शिंदे गटाचे नेते चंद्रकांत रघुवंशी यांनी हाणला.

# आई यल्लमा देवी यात्रोत्सवाला सुरुवात; महाआरतीसह रक्तदान

### आज पालखी मिरवणूक

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



शहरातील मालेगाव रोडवरील श्री आई रेणुकादेवी यल्लमा यात्रोत्सवाला सुरवात झाली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तथा माजी आ.राजवर्धन कदमबांडे यांच्या हस्ते दुपारी महाआरती झाली. यावेळी रक्तदान शिबिर झाले. या कार्यक्रमाला श्री महामंडलेश्वर पार्वती रवी पुजारी, ट्रस्टचे अध्यक्ष बबन जिरेकर, एकनाथ विजय व्यायाम शाळेचे अध्यक्ष पैलवान संजय शेंडे, अशोक कोरे, जीवन शेंडगे, मयुर खोपडे, मयुर कंर्ड्रे, अशोक मंगीडकर, सुनिल जिरेकर, बंटी शेवतकर, सागर चौगुले,अविनाश लोकरे, बाळू मंगीळकर याच्यांसह यलमार समाज बांधव उपस्थित होते. आज मंगळवारी दुपारी २ वाजता देवीची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

# धुळे जिल्हा वार्षिक योजनेचा ३८२ कोटी २८ लाख रुपयांचा प्रारुप आराखडा मंजूर

### पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



धुळे जिल्हा नियोजन समितीची आज धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज व पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली आज झाली. या बैठकीत सन २०२४-२०२५ या वर्षासाठी ३८२ कोटी २८ लाख रुपयांच्या प्रारुप आराखड्यास मान्यता देण्यात आली. हा आराखडा मान्यतेसाठी राज्यस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहे.

पालकमंत्री श्री. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली. या बैठकीस खासदार डॉ. सुभाष भामरे, जिल्हा परिषद अध्यक्षा धरती देवरे, आमदार अमरिशभाई पटेल, आमदार जयकुमार रावल, आमदार काशिराम पावरा, आमदार मंजुळा गावित, जिल्हाधिकारी अभिनय गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर आदी उपस्थित होते.

सन २०२४-२०२५ करिता सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रुपये २४८ कोटी, आदिवासी उपयोजनेअंतर्गत रुपये १०३ कोटी २८ लक्ष आणि अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत रुपये ३१ कोटी अशी एकूण ३८२ कोटी २८ लक्ष मर्यादा शासनाने कळविलेली आहे. त्यानुसार हा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला आहे. भारताला सन २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचा संकल्प करण्यात आलेला असून सन २०२५-२६ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट जाहिर केले आहे. सदर उद्दीष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२७ पर्यंत एक ट्रिलीयन डॉलर, सन २०३७ पर्यंत २.५ ट्रिलीयन डॉलर व सन २०४७ पर्यंत ३.५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट राज्य शासनाने निश्चित केले आहे. सदर उद्दीष्ट साध्य करणे करीता जिल्हावार लक्ष केंद्रीत करण्यात आले असून विविध जिल्ह्यातील सामाजिक-आर्थिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधनांतील असमानता इ. बाबी विचारात घेऊन प्रत्येक जिल्ह्यासाठी 'जिल्हा विकास आराखडा तयार करणे करीता नियोजन विभागाच्या सुचना आहे. मार्चअखेर १०० टक्के निधी खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी यावेळी दिली.

# धुळ्यात नव्याने तीन बनावट डॉक्टरांविरुध्द कारवाई

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

वैद्यकीय व्यवसायाचा परवाना नसताना लोपॅथीचा औषधसाठा बाळगून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या आणखी तीन बनावट डॉक्टरांविरुद्ध धुळे जिल्ह्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिसांनी मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सुहास वाघ (४३, रा.प्लॉट दोंडाईचा), राजु मलिक (रिटाणे, साक्री) आणि अमोल सूर्यवंशी (३६, नरव्हाळ,धुळे) अशी पोलिसांनी गुन्हा दाखल केलेल्या बनावट डॉक्टरांची नावे आहेत. पोलीस अधीक्षक श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार आरोग्य विभाग आणि पोलीस खात्याने संयुक्तिकपणे ही कारवाई केली. वैद्यकीय व्यवसायाचा परवाना किंवा शिक्षण नसताना या बनावट डॉक्टरांनी स्वतःजवळ लोपॅथीचा औषधसाठा ठेवला होता, असा आरोप आहे. बनावट डॉक्टरांवर कारवाई करण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलीस अधीक्षक धिवरे यांनी संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना बनावट डॉक्टरांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.

## पुणे थरारले

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी ही पुण्याची ओळख कधीच पुसली गेली. जमिनी, त्यातून येणारा सहज पैसा, त्यात राजकारण्यांचा संबंध यातून संघटित गुन्हेगारीचे नवे रूप आणि 'प्रारूप' उदयास आले आहे.

पुण्याच्या मध्यवस्तीत म्हणता येईल असा कोथरूडचा परिसर. तेथे भर दुपारी गोळ्या घालून एकाचा खून होतो, मारेकरी पळून जातो... रहस्यकथेत शोभावी अशी घटना प्रत्यक्ष घडली. कोथरूडचे रहिवासी तर हादरलेच; पण पुण्यातही खळबळ माजली. शरद मोहोळ असे मरण पावलेल्याचे नाव आहे. गुंडगिरी आणि गुन्हेगारीबद्दल तो कुख्यात होता. त्याची हत्या करणारा त्याचाच साथीदार होता, असे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्हेगारी जगतातील माणसे एरवी आपल्या सुरक्षिततेविषयी सावध असतात; पण आपले सहकारी आपल्याबरोबर आहेत या विचाराने शरद मोहोळ गाफील राहिला असावा आणि प्राणास मुकला. या घटनेने पुणे शहर व परिसरातील वाढलेल्या संघटित गुन्हेगारीवर पुन्हा प्रकाशझोत पडला आहे. पोलिस दल संघटित गुन्हेगारीस आळा घालण्यात कमी पडत आहे, हे या हत्येने अधोरेखित केले आहे. त्याची कारणे कोण शोधणार आणि त्यास रोखणार कोण हे सवाल अधिक बेचैन करणारे आहेत. शैक्षणिक वातावरणासाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यात गुन्हेगारी का वाढत आहे हा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. शहरांमध्ये येणारा पैसा गुन्हेगारी वृत्तीच्या व्यक्तींना आकर्षित करतो असे मानले तरी ते 'बडे' टोळीवाले गुन्हेगार, इंग्रजीत 'गँगस्टर', कसे बनतात? हे सामान्यांपुढील कोडे आहे.

राजकीय वरदहस्त?

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शरद मोहोळ पुण्याजवळच्या मुळशी तालुक्यातल्या एका लहान गावातून आला. मुठा हे गाव छोटे असले तरी तेथील संदीप मोहोळ या गुन्हेगारामुळे ते प्रसिद्ध झाले. शरद हा संदीपचा निकटवर्ती होता. संदीप मोहोळ याचाही टोळ्यांच्या वैमनस्यातून खून झाला होता. त्यानंतर शरद मोहोळ टोळी प्रमुख म्हणून उदयास आला. मात्र तो खर्या अर्थाने 'कुख्यात' बनला ते कतील सिद्दिकी याच्या खुनामुळे. 'इंडियन मुजाहिदीन' या अतिरेकी संघटनेचा कतील सदस्य होता. पुण्यातील जर्मन बेकरीतील स्फोटासह देशाच्या विविध भागांत स्फोट घडवून आणण्यात तो सहभागी होता. येरवडा तुरुंगात कतील असताना त्याचा कोठडीत खून झाला. त्यावेळी शरद मोहोळही त्याच तुरुंगात होता. कतीलच्या खुनाचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला. मात्र, सात वर्षांनंतर, २०१९मध्ये, सबळ पुराव्याअभावी त्याची सुटका करण्यात आली. खून कोणी केला? हे रहस्य उलगडले नाही. २०१२मध्ये तुरुंगात असताना शरदने गावच्या सरपंचपदाची निवडणूकही लढवली. तो बिनविरोध जिंकला. ते स्वाभाविक होते. त्याच्या विरोधात निवडणूक लढवली, तर आपली गत काय होईल हे सर्वांना माहीत होते. देशाची अर्थव्यवस्था खुली होणे, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची भरभराट, परदेशात नोकरी-व्यवसायासाठी जाणे, अशा कारणांमुळे देशात भरपूर पैसा येऊ लागला. त्यातून शहराबाहेर जमिनी घेणे, तेथे बंगले बांधणे ही 'फॅशन' बनली. गुंतवणूक करू पाहणार्या सर्वांकडे काळा पैसा होता असे नाही; पण ग्रामीण भागातील जमिनींच्या व्यवहारातून तो तयार होऊ लागला. अशा व्यवहारांत जमिनींवर कब्जा करणारे अनेक शरद मोहोळ निर्माण झाले. आर्थिक व्यवहारातून शरदचा खून त्याच्या साथीदाराने केल्याचे पोलिस सांगत आहेत. हा पैसा परंपरागत, वारसा हक्काने आलेला नव्हता. खंडणी किंवा तशाच प्रकारच्या गैरकृत्यातून जमा केलेला तो पैसा होता. त्याबद्दलच्या वादाचा परिणाम रक्ताळलेला असणार हे ओघानेच आले. शरद याची पत्नी स्वाती पुण्याच्या भारतीय जनता पक्षाच्या सदस्य आहेत. हिंदुवादी संघटनांच्या कार्यक्रमात शरद उत्साहाने सहभागी होत असे, अशीही माहिती पुढे आली आहे. या दांपत्याची पार्श्वभूमी पक्षाने तपासली होती की नव्हती? शरद याची कृत्ये माहीत असूनही पक्षाने व त्याच्याशी संबंधित संस्था संघटनांनी तिकडे दुर्लक्ष केले का? राजकारण आणि गुन्हेगारी यांच्या संबंधाचे हे आणखी एक उदाहरण. देश पातळीवर अशी असंख्य उदाहरणे आहेत. राजकीय वरद हस्तामुळेच शरद 'मोठा' झाला आणि त्याची कृष्णकृत्ये चालू राहिली असे मानता येईल. त्याच्या हत्येने पुणे थरारले, आणखी किती हत्या? हा प्रश्न आता उभा आहे.

## राम आयेंगे तो ...... !!



२२ जानेवारी २०२४ हा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाणार आहे. ५५० वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर श्रीरामजन्मभूमी अयोध्येत बांधण्यात आलेल्या श्रीरामाच्या भव्य-दिव्य मंदिराचे उद्घाटन होणार आहे. मंदिराच्या गर्भगृहात श्रीरामलल्ला विराजमान होणार आहेत. हा स्वर्गीय सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी जगभरातील हिंदूंची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सध्याचा पिढीचे खरोखर अहोभाग्य आहे कि हा अद्वितीय सोहळा त्यांना पाहायला मिळणार अनुभवायला मिळणार आहे. या सोनेरी क्षणाचे सर्वांना साक्षीदार होता येणार आहे.

२२ जानेवारीला अयोध्येत होणाऱ्या अभूतपूर्व सोहळयाचे वेध जगभरातील रामभक्तांना लागले आहेत, त्यामुळे आतापासूनच सर्वत्रचे वातावरण राममय होऊ लागले आहे. सध्या तरुणवर्गाच्या स्टेटसला विविध रिल्सच्या माध्यमातून अयोध्येतील श्रीराममंदिराचेच दर्शन प्रतिदिन घडत आहे. मोबाईलच्या रिंगटोन, कॉलर ट्यून सुद्धा श्रीरामप्रभुंच्या स्वागताच्याच ठेवल्या जात आहेत. बाजारात श्रीरामप्रभूंचे चित्र असलेले ती शर्ट, भगवे ध्वज विक्रीसाठी आले आहेत. शोभेच्या आणि भेट वस्तूंच्या दुकानात श्रीरामप्रभुंची छायाचित्रे, मुर्त्या आणि श्री राम मंदिराची प्रतिकृती दर्शनी भागांत विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत. ठिकठिकाणी काढण्यात येणाऱ्या अक्षत कळस यात्रांतून श्रीरामभक्तांचा सळसळता उत्साह दिसून येत आहे. अयोध्येतील दिव्य सोहळ्याची निमंत्रणे वाटली जाऊ लागली आहेत. घरोघरी अक्षतांचे वाटप होऊ लागले आहे. २२ जानेवारीला अयोध्येत न येता श्रीरामभक्तांनी घरोघरी दीप लावून दिवाळी साजरी करण्याचे आवाहन करताना माननीय पंतप्रधानांनी 'श्रीरामाला त्रास होईल,असे काही करू नका' असे भावनिक आवाहन सुद्धा केल्याने श्रीरामाचे स्वागत घरोघरी करण्याचा निर्णय देशवासीयांनी घेतला आहे. प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचे निमंत्रण कोणाला मिळाले तर कोणाला मिळाले नाही यावरून काही काळ राज्यात मानापमान नाट्य गाजले असले, तरी श्रीरामप्रभुंच्या स्वागतामध्ये कसला आलाय मान आणि कसला अपमान हे लक्षात घेऊन हा वादही आता शमू लागलाआहे. श्रीराम प्रतिष्ठापनेवरून राजकारण केले जात असल्याच्या आरोप काही राजकीय मंडळींकडून केला जात असला तरी सामान्य श्रीरामभक्तांना याचेही काही देणेघेणे नाही. समस्त भारतभूमीचे आराध्य दैवत प्रभुराम केवळ अयोध्येत नव्हे, तर संपूर्ण भारतभूमीत, प्रत्येकाच्या घरात आणि आणि प्रत्येकाच्या हृदय मंदिरात येणार आहेत या भावाने आज सर्वत्र सिद्धता सुरु आहे. काही ठिकाणी मंदिरांत हा सोहळा सार्वजनिकरित्या साजरा केला जाणार आहे, तर काही मंडळांनी श्री रामनवमी प्रमाणे हा महोत्सवही धुमधडाक्यात साजरा करण्याची तयारी केली आहे.

रावणवध केल्यानंतर वनवास संपवून प्रभू श्रीरामचंद्र जेव्हा अयोध्या नगरीत परतले, तेव्हा अयोध्या नगरीतील समस्त नागरिकांनी दारी तोरणे बांधली, दारासमोर रांगोळ्या काढल्या, गुढ्या उभारल्या, सर्वत्र दीप प्रज्वलित केले. सारी अयोध्या नगरी तेव्हा नव्या नवरीप्रमाणे नटली होती. साडेपाचशे वर्षाच्या वनवासानंतर श्रीरामप्रभूंचे पुनश्च आगमन होत आहे या भावाने देशभरातील श्रीरामभक्त घरोघरी श्रीरामाच्या स्वागताची तयारी करत आहेत. ज्यामध्ये घरातील बच्चे कंपनीही उत्साहाने सहभागी होत आहेत. २२ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी अशी मागणी काही सरकारमधील आमदारांकडूनच करण्यात येत आहे. प्रत्यक्षात या दिवशी सुट्टी मिळेल कि नाही माहित नाही; मात्र विविध खासगी कंपन्या आणि कार्यालयांनीही बैठका घेऊन श्रीरामाच्या स्वागतासाठी कामाच्या ठिकाणीच उत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने नियोजन केले आहे. कंपन्यांचे मालक स्वतः त्यामध्ये हिरीरीने सहभागी होत आहेत. श्रीरामप्रभुंच्या स्वागतार्थ मकर संक्रांतीपासून म्हणजे १४ तारखेपासून विशेष स्वच्छता मोहीम राबवून देशभरातील मंदिरे स्वच्छ करण्याचे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले आहे. त्यादृष्टीनेही मंदिर विश्वस्त आणि भक्त मंडळींनी नियोजन केले असून १४ तारखेपासून हे अभियान देशभर राबवले जाणार आहे. त्यानिमित्ताने सर्वत्र चैतन्याचे वातावरण निर्माण होणार आहे.

प्रभू श्रीरामांची उच्च कोटीची भक्त शबरी हिला जेव्हा तिच्या गुरूंनी तुझा उद्धार करायला स्वतः श्रीरामप्रभू येणार आहेत असे सांगितले त्या क्षणापासून तिने श्रीरामाच्या स्वागताची तयारी सुरु केली. त्यासाठी प्रतिदिन ती आश्रमाची, आश्रमात येण्याच्या मार्गाची झाडलोट करत असे. ज्या मार्गावरून श्रीराम येणार आहेत त्या मार्गावर फुलांचा गालिचा घालत असे. श्री रामासाठी आसन आणि त्यांच्या पाद्यपूजेची सिद्धता करत असे. त्यांच्या नैवेद्यासाठी भोजन तयार करत असे. रात्री भगवंत आले, तर त्यांच्याशी माझी भेट होणार नाही या भीतीने ती रात्रभर झोपेतही नसे. असा तिचा दिनक्रम वर्षोनुवर्षे चालू होता. प्रतिदिन अशी तयारी करता करता वार्धक्य कधी आले तिला कळलेही नाही. अखेर तिच्या परीक्षेचा काळ संपला, दारात श्री विष्णूंचा अवतार प्रगटला. सुटले बांध प्रतिक्षेचे. मिलन झाले भगवंताचे. अश्रूंनी केले पाद्यपूजन श्रीप्रभूंचे, रामानेही ओळखले भाव तिच्या अंतरीचे. खाल्ली उष्टी बोरे ती प्रेमाची, साक्ष दिली आपल्या अवतारत्वाची. जेव्हा तुम्ही संपूर्ण शरणागतीने भगवंताच्या भक्तीत लीन होता, जेव्हा त्याला आपले सर्वस्व अर्पण करता तेव्हा त्या जगनियंत्या भगवंतालाही आपले आसन सोडून तुमच्यासाठी यावेच लागते. येत्या २२ जानेवारीला प्रभूश्रीरामांना शबरीच्या भावाने आळवूया. श्री रामभक्तानी साडेपाचशे वर्षांपासून विविध माध्यमातून केलेल्या भक्ती रुपी प्रयत्नांना अखेर यश आले आणि बघता बघता श्रीरामजन्मभूमीत श्रीरामाचे भव्य मंदिर उभे राहिले. २२ जानेवारीला साक्षात श्रीराम आपल्या घरी, जवळच्या मंदिरात, मंडळातील उत्सवात येणार आहेत हा भाव ठेवूनच सर्व सिद्धता करूया. भगवंत हा भावाचा भुकेला असतो. त्याला अवडंबरापेक्षा अधिक प्रिय असते ते भक्ताचे निर्मल मन. भगवंताच्या चरणी पुष्प वाहताना आपण जसे ते नीट निरखून आणि स्वच्छ करून वाहतो, तसे श्रीरामाचे स्वागत करताना आपले मन स्वच्छ आणि निर्मल करण्याचा प्रयत्न करूया. त्यासाठी २२ जानेवारीच्या दिवशी 'श्रीराम जय राम जय जय राम' हा श्रीरामांचा नामजप अधिकाधिक भावपूर्ण रीतीने करूया. श्री रामरक्षा स्तोत्राचे पठण करूया. श्रीरामाच्या अथवा घरातील देवतेच्या प्रतिमेचे पूजन करताना आपल्यासमोर साक्षात श्रीरामप्रभू विराजमान आहेत आणि आपण त्यांचे पाद्यपूजन करत आहोत या भावाने पूजन करूया. आपल्या ऐपतीप्रमाणे भगवंताला मिष्टान्नांचा नैवेद्य अर्पण करूया. दारासमोर रांगोळी काढूया, दिवाळीप्रमाणे दारात पणत्या लावूया. श्रीरामप्रभुंच्या स्वागताची सिद्धता सर्व कुटुंबियांना सहभागी करून करूया. एक दिवसाकरिता का होईना रामराज्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊया आणि पृथ्वीतलावर रामराज्य आणण्यासाठी श्रीरामप्रभूंच्या चरणी शरणागत होऊन प्रार्थना करूया !




जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०


## अनैतिक संबंध आणि त्याचे सार्वजनिक प्रदर्शन!

कोणत्याही स्त्री - पुरुषांमधील अनैतिक विवाहबाह्य संबंध असोत की विवाहित, एकल स्त्री - पुरुष यांच्यामधील रिलेशनशिप असो, कोणत्याही नात्यातील नियमबाह्य अनुचित शारीरिक संबंध असोत, त्याचे जाहीर प्रदर्शन करणे, सामाजिक भान न ठेवता राजरोस स्वतःची अनैतिकता अभिमानाने मिरविणे, कसलीही तमा न बाळगता चुकीच्या नात्यांना देखील समाजात, सार्वजनिक ठिकाणी मिरवणे आणि स्वतःला अत्यंत फॉरवर्ड, पुढारलेले, आधुनिक मतांचे आहोत, सगळेच करतात मग आम्ही केले तर काय बिघडले हे दाखविण्याचा प्रयत्न करणे यांचे प्रमाण वाढत चाललेले दिसते.

बनावट नात्याला अधिकृत करण्याचा प्रयत्न करण्यासाठी त्याला वेगवेगळे लेबल लावून आपल्या दुष्कृत्याला समाजापुढे अभिमानाने दाखविणे ही जणू आज फॅशन झाली आहे. पहिली पत्नी अथवा पती हयात असताना, घटस्फोट झालेला नसताना भलत्याच व्यक्तीला द्वितीय पत्नी अथवा पती म्हणून समाजापुढे आणणे, अत्यंत सहजरीत्या तसा अभिनय करणे सातत्याने वाढत आहे. ही त्याच्यासोबत असते बरं का, हा तिच्या ताब्यात आहे, ही आधी अमुक बरोबर होती, आता हा पकडला आहे. हिला त्याने वापरले, फिरवून सोडले, आता ही अमुकच्या घरात शिरली आहे, हा तिच्या नादी लागला आहे, तिने त्याला पैशासाठी धरले आहे, तो तिला वापरतोय, असे बोलणे सर्रासपणे आपल्या कानावर पडत असतात.

कुटुंबात, समाजात, सार्वजनिक ठिकाणी, आजूबाजूला असलेल्या लहान - मोठ्या, वयोवृद्ध लोकांचा विचार न करता, खऱ्या नात्यांची तमा न बाळगता सर्व नितीमूल्ये, संस्कार, मर्यादा ओलांडून आपल्या तकलादू रिलेशनचे सार्वजनिक प्रदर्शन करणे, एकमेकांप्रति अतिप्रेम, अतिजवळीक, अतिउत्साह, अतिबांधिलकी, काळजी, शारीरिक लगट आणि घसट चारचौघांत दाखवून अनेक महिला आणि पुरुष स्वतःची सामाजिक प्रतिमा मलीन करून घेताना दिसतात. विशेष म्हणजे अशा चुकीच्या नात्यामध्ये वाहवत गेलेल्या महिलासुद्धा कुठेही न घाबरता, न लाजता, न कोणाची भीड बाळगता, पुढचा- मागचा कोणताही विचार न करता बिनधास्त ज्याच्याशी चुकीचे संबंध आहेत त्या पुरुषासोबत वावरतात. कुठलाही कायदेशीर लग्नाचा आधार नसताना, अनेक महिला आणि पुरुषसुद्धा स्वतः ला एखाद्याची बायको अथवा नवरा म्हणून घोषित करतात.


आपलं नातं खोटं आहे, चुकीचं आहे, आपलं नातं कोणत्याही अख्त्यारीत बसत नाही, ते समाजमान्य नाही, बेकायदेशीर आहे, तत्कालिक आहे हे माहिती असून सुद्धा स्त्रिया जेव्हा स्वतःची इज्जत, अब्रू, मर्यादा सोडून जर परपुरुषासोबत उघड उघड अशा संबंधांचे प्रदर्शन करीत असतील, तर फक्त पुरुषांना दोष देण्यात अर्थ नाही. ज्या नात्यातून भविष्यात काहीच पदरी पडणार नाहीये त्या नात्याचा गाजावाजा करण्यात आणि बदनाम होण्यात महिलांना कोणतं साहस, कोणतं प्रेम आणि कोणतं सुख मिळतं हा खूप मोठा वैचारिक विषय आहे. अनेक महिला आपल्या मुलांचा, घरातल्यांचा, आई - वडील, सासरचा विचार न करता रक्ताच्या हक्काच्या लोकांना, नात्यांना झुगारून कोणाच्याही आयुष्यात स्वतःचं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

विशेष म्हणजे ज्या ठिकाणी खरं प्रेम आहे, खरं नातं आहे, ज्या नात्याला नैतिकतेचा आधार आहे, ज्या नात्याला नाव आहे आणि समाजात ज्या नात्याचे स्थान आहे, अशा कोणत्याही ठिकाणी दिखावा अथवा उथळपणा पाहायला मिळत नाही. तशी गरज पण भक्कम पायावर उभ्या असलेल्या नात्याला वाटत नाही. जे नातेसंबंध समाजमान्य असतात, सर्वानुमते स्वीकारलेले असतात त्या ठिकाणी संयम, सहनशीलता, शांतता, सभ्यता, आदर निदर्शनास येतो. उलटपक्षी ज्या ठिकाणी चुकीच्या माध्यमातून, अयोग्य पद्धतीने, नैतिकता धुडकाऊन पोकळ आणि पोरखेळ असल्याप्रमाणे संबंध ठेवलेले असतात तिथे जास्तीत जास्त दिखावा स्पष्ट जाणवतो आणि आजमितीला ही वागणूक अनेकांना अंगवळणी पडलेली दिसून येते.

जी गोष्ट चुकीची आहे ती खरं तर करायचीच नसते, त्यातून ती केलीच किंवा घडलीच तर लपवायची असते, लपवायचा प्रयत्न तरी करायचा असतो. पूर्वी कोणाला कळू नये, समजू नये, कुठे आपलं नाव खराब होऊ नये, कोणी आपल्याला अयोग्य समजू नये; कुटुंबात, समाजात बदनामी, मानहानी होऊ नये, आपल्या मुलांना भविष्यात आपल्या चुकीच्या वागणुकीमुळे मान खाली घालायला लागू नये, आपल्या घरातील ज्येष्ठांना कुठे कमीपणा वाटू नये, म्हणून असे नातेसंबंध झाकायचे असतात. इतकी नीतिमत्ता तरी पाहायला मिळत होती; **क्रमशः**


काऊन्सलिंग: मीनाक्षी जगदाळे


## शब्दकोडे-२८८



**आडवे शब्द**

१. शहिदांचे दिल्ली येथील स्मारक '------ ज्योती' ६. निर्णय ९. समुद्रकिनारा १२. हिंदीत पशू १४. डुक्कर १५. गायीचे पिल्लू १६. मुरुमाची जमीन १८. रमापती २०. खराब झालेला आंबा २१. व्यक्ती, मनुष्य २३. अनुयायी, पायदळातील शिपाई २५. स्वामी २६. समुद्र २७. जास्तीत जास्त व कमीत कमी २९. चालविणारा अवयव ३०. दारूचा एक प्रकार ३२. मलई ३३. दिवस ३४. मध ३६. सर्वस्व ३७. गाय ३८. खाली मान घातलेला ४०. रत्न ४२. श्रीविष्णुचे बटुरूप ४६. होडी ४७. आई ४८. वरपांगी, दिखाऊ ४९. मीठाची चव ५०. तीव्र ऊन ५२. भूतकाळ ५४. वाळवंट ५५. लक्ष्मीचे एक नाव ५७. नूतन ६०. षष्ठीची देवता ६२. वृक्ष ६३. वर्ष, साल ६५. अखेर ६७. उद्यानंतरचा दिवस ६९. वचक ७०. क्रिकेटच्या खेळातील सहा धावांचा फटका ७२. दाणे वगैरे कुटण्याचे पूर्वीचे साधन ७४. वाईट, नासके ७६. मकर ७७. नवा जोम, चपळता ८०. हात ८१. माळेत हे ओवतात ८२. माती नसलेली जमीन

**उभे शब्द**

१. अव्यस्थित राहणारा २. अंत:करण ३. गोव्यातील शिवशंभो ४. सोन्याचा वस्त्रातील धागा ५. शहर ६. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया ७. तुरूंग ८. लाट, हुक्की १०. एक शेंगभाजी ११. आवड, रूची १२. तारूण्य १६. ठेकेदार १७. आईचा भाऊ १९. नवरदेवाची आई २२. संतोष, आनंद २४. गुणज्ञ २५. चित्रपटाचा हिरो २८. शेतकरी २९. गरीब, क्षुल्लक ३०. दात ३१. जन्म-मृत्यू ३३. पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण ३५. रंगवलेले ३९. पुरुषांचे नेसण्याचे हे वस्त्र आता कालबाह्य होत चाललेय ४०. प्रजा ४१. खास, विशेष हकीगत ४२. शेतजमीन ४३. गोदाम ४४. पदार्थ शिजतानाचा आवाज ४७. पत्ता ५१. रड्या माणूस ५३. कर्ण ५६. खवा ५८. 'दारु' मोजण्याने बदनाम झालेले माप ५९. गाडीचे छत ६०. प्रश्न ६१. मुस्लिमांचा एक सण ६४. नट्टापट्टा ६६. बंगाली रुपया ६८. शुष्कता ७१. सुंदर तरुणी ७३. फणसाचा एक प्रकार ७४. गाढव ७५. बगळा ७८. रमणीय, मनोहारी ७९. पद्धत

### शब्दकोडे-२८७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.फटफजिती ४.भारत श्रीलंका ९.कात ११.रसा १३.मन १४.केकवाली १६.फटकळ १७.रमणीय १९.नाक २०.पोकळ २१.करवत २३.साफ २४.तरु २६.साळ २७.वरचढ ३०.पावलोपावली ३२.धकधक ३४.माया ३५.साट ३६.तनमनधन ३८.काल ३९.सदा ४१.वदन ४२.गडप ४३.कनक ४५.हालहवाल ४७.घर ४८.डर ५०.कट ५१.कमानदार ५४.गो ५५.अनुवादक ५७.खडकाळ ५९.रावा ६०.कलम ६१.नगर ६३.मजल ६४.वासा ६५.भार ६६.क्षमा ६७.मळवट ६८.खानदान ७१.मादक ७२.कळ ७३.कासार ७५.दरडोई ७७.करकरीत ७९.भुईसपाट ८०.महिरप

**उभे उत्तर**

१.फटफटीत २.फटाकडी ३.तीर ५.रमणी ६.तनय ७.लंकेश्वर ८.काका १०.तडकफडक १२.सारक १५.वसंत १८.मळवली १९.नासा २०.पोळपाट २१.कढ २२.वर्ण २५.रुपाया २६.धडपड ३४.माफक ३७.मद ३८.काक ३९.सल ४०.दाहक ४४.नफानुकसान ४५.हाटक ४६.वामा ४९.रखवालदार ५०.कदम ५२.दाखला ५३.रड ५६.वाल ५८.काजळ ५९.राज ६१.नरमाई ६२.रक्षक ६३.मटका ६४.वाखाणणी ६७.मळकट ६९.दादला ७०.नर ७२.करपा ७४.साखर ७६.डोके ७७.कस ७८.तम


## राजेंद्र कुमार



जुबली कुमार,अर्थात राजेंद्र कुमार.

राजेंद्र कुमार २० जुलै १९२९ रोजी सियालकोट पंजाब,

६० ते ७० दशकातील राजेंद्र कुमार एक प्रसिद्ध अभिनेते होते. आपली चित्रपटातील कारकिर्दी राजेंद्र कुमारने १९५० दिलीप कुमार नर्गिस सोबत जोगनचित्रपटापासून केली होती.




नंतर १९५७ मदत इंडिया मध्ये नर्गिस यांच्या मुलाची भूमिका केली व हा चित्रपट खूप गाजला.१९५९ मध्ये गूंज उठी शहनाई या चित्रपटाच्या यशाने त्यांना उत्कृष्ट अभिनेता म्हणून ओळख मिळाली.१९६० च्या दशकात लागोपाठ ६ ते ७ चित्रपट सिल्वर जुबली झाले व लोक जुबली कुमार म्हणून ओळखू लागले. १९५९ धूल का फूल, १९६३ दिल एक मंदिर १९६३ मेरे महबूब १९६४ संगम १९६५ आरजू, प्यार का सागर, गहरा दाग, १९६६ सूरज आणि तलाश असे एकाहून एक सरस चित्रपट दिले.

दिल एक मंदिर,आई मिलन की बेला,सूरज या चित्रपटासाठी सर्व श्रेष्ठ अभिनेता फिल्मफेयर पुरस्कारासाठी नामांकित केले गेले होते.

राजेंद्र कुमारने १९८१ लव स्टोरी मधून आपला पुत्र कुमार गौरवचे चित्रपटा क्षेत्रात पदार्पण केले होते.

या चित्रपटाचे निर्माते दिग्दर्शक स्वतः राजेंद्रकुमार होते. याच बरोबर त्यांनी कुमार गौरवच्या वडिलांची भूमिका केली होती. बॉक्स ऑफिसवर चित्रपट हिट झाला, नंतर परत कुमार गौरव सोबत संजय दत्तला घेऊन दुसरा चित्रपट नाम बनवला हा ही चित्रपट हिट ठरला. अर्थ हा चित्रपट राजेंद्रकुमार अभिनित शेवटचा चित्रपट होता.असा हर हर हुंनरी अभिनेता १२ जुलै १९९९ रोजी काळाच्या पडद्या आड गेला.


हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले. **'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४. **नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### दोन दुचाक एकमेकांना धडकल्या

**शिरपूर ।** भरधाव वेगाने असलेल्या दोन दुचाकी एकमेकांना धडकल्या. यात एकाला गंभीर दुखापत झाली. ही घटना गोराणे फाट्यावर घडली होती. यात ज्ञानेश्र्वर जयराम चौघुले यांना गंभीर दुखापत झाली होती. अपघाताची नोंद नरडाणा पोलिसात करण्यात आली.

# अडगळीत टाकलेल्या वस्तू देवून गरजूंना सहकार्य करा ; योगगुरु नंदकुमार देसाई यांच्या कल्पनेचे स्वागत

**नाशिक । प्रतिनिधी**

बदली झाली किंवा नवीन वस्तू घ्यायच्या असल्या तर वापरात नसलेल्या वस्तू त्यात फर्निचर असो की इलेक्ट्रॉनिक वस्तू त्या कवडीमोल भावात विक्री करून नंतर काही जण हळहळत बसतात. परंतु या वस्तू गरजूंना देऊन त्यांना सहकार्य करु शकतो, अशी भन्नाट कल्पना भाजपा पर्यटन विकास आघाडीचे संयोजक योगगुरु नंदकुमार देसाई यांनी मांडली असून त्यांच्या या कल्पनेचे सर्व थरातून स्वागत होत आहे.

नंदकुमार देसाई हे आगळे वेगळे व्यक्तिमत्व असून सतत त्यांच्या डोक्यात नवनवीन कल्पना येत असतात. काही दिवसांपूर्वीच त्यांनी लोकांना वापरात नसलेले कपडे देण्याचे आवाहन केले होते. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लोकांनी वापरात नसलेले चांगल्या दर्जाचे कपडे आणून दिले. नंतर हे सगळे कपडे व्यवस्थित इस्त्री करून आदिवासी पाड्यांवर त्याचे वाटप करण्यात आले. त्यामुळे आदिवासींच्या चेहऱ्यावरील आनंद लाख मोलाचा वाटला. नंदू देसाई यांना या कार्यात मदत करणाऱ्या सहकाऱ्यांची भली मोठी यादी असून पडद्याआड राहून ते हे सर्व कार्य करीत असतात.



आजकाल बदली झाली किंवा नवीन वस्तू घ्यायच्या असल्यास जुन्या वस्तूंचे म्हणजे फर्निचर, इलेक्ट्रॉनिकच्या वस्तू तसेच अडगळीत टाकलेल्या वस्तू म्हणजे काय करायचे? हा यक्षप्रश्न लोकांपुढे असतो. परंतु या वस्तू गरजूंना दिल्याने आपणास मनस्वी आनंद होतो व आपल्या वस्तु सत्कारणी लाभल्याचे समाधान मिळते. तसेच त्यांच्याकडुन आपल्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते. त्यामुळे ज्यांना या वस्तू द्यायच्या असतील आणि ज्या गरजूंना या वस्तू हव्या असतील त्यांनी योगगुरु नंदकुमार देसाई मोबाईल क्र.९४२२२४९४९०, मोहन देसाई मोबाईल क्र. ९८२२३३४९००, संजय संघवी मोबाईल क्र. ९२२६१०८००३०००, प्रदीप पाटील ९९६०४९५४९५ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच ज्यांच्याकडे अडगळीत टाकलेल्या सायकली व उपयोगात आणता येणारे इतर साहित्य असेल आणि ज्यांना गरजूंना त्या देण्याची तयारी असेल त्यांनीही आमच्याशी संपर्क साधावा. या सायकली विद्यार्थी किंवा गरजूंपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था आम्ही करू, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# देशांत संघटीत होऊन काम केल्यास माळी समाजाची प्रगती

**नाशिक । प्रतिनिधी**

देशांत माळी समाज हा सैनी, मौर्य, कुशवाह अश्या विविध नावाने वेगवेगळ्या प्रदेशमध्ये ओळखला जात असून देशातील माळी समाज हा एक असून देशांतील सर्वांनी संघटीत होऊन काम केल्यास प्रगती होईल. त्यामुळे उद्योग व्यवसायात व राजकारणात माळी समाजाने पुढे आले पाहिजे असे आवाहन ऑल इंडिया सैनी सेवा समाज संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष उद्योजक दिलबागसिंघ सैनी यांनी केले.

ऑल इंडिया सैनी (माळी) सेवा समाज संस्थेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक रविवारी ७ जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगर रोडवरील धनलक्ष्मी बँक्वेट हॉल येथे उत्सहात पार पडली. दिवसभर विविध विषयांवर मंथन करण्यात आले. सर्व प्रदेशाध्यक्ष यांनी आपल्या कार्यायाची माहिती दिली .यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय अध्यक्ष व उद्योजक दिलबाग सैनी, कोर कमिटीचे चेअरमन दिनेश सैनी, राष्ट्रीय युवा अध्यक्ष प्रदीप सैनी, राष्ट्रीय महिला अध्यक्ष श्रीमती कमलेश बेह्ल सैनी, वरिष्ठ उपाध्यक्ष ताराचंद गेहलोत ,राष्ट्रीय संघटन महासचिव राजकुमार सैनी, माजी महिला अध्यक्ष वर्षा नाथ, चेअरमन युतिका वेलफेयर फाउंडेशन जे.एन गेहलोत, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विजय राऊत, राष्ट्रीय संघटन सचिव पी.एम सैनी, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप नाईक, प्रदेश उपाध्यक्ष मुरली बालन, राष्ट्रीय सचिव सुजाता इळ्वे, प्रदेश कार्याध्यक्ष चेनाराम माली, भवरलाल टाक, उमेदमल माली, अशोक कुशवाह, युवा अध्यक्ष उपेश कानडे, महिला कार्याध्यक्ष सुजाता माळी, प्रदेश उपाध्यक्ष मनरूप कच्छवाह, बाजीराव तिडके, मंगला माळी उपस्थित होते.



पुढे बोलतांना दिलबाग सैनी यांनी देशभरात माळी समाजाची संख्या मोठी आहे पण फक्त जिल्हा, प्रदेश स्तरावर संघटीत राहून चालणार नाही दे.शभरात संघटीत ताकद उभी राहिली पाहिजे पण त्यासाठी आपल्याला प्रत्येक राज्यांत राष्ट्रीय बैठक झाली पाहिजे अशी सर्व राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची मागणी होती. त्यानुसार पहिली त्रैमासिक सभा राजस्थान, मथुरा,आणि तिसरी बैठक नाशिक महाराष्ट्र येथे पार पडली. त्याचा चांगला परिणाम होत असून देशभरातील समाज बांधवांच्या विचारांचे आदानप्रदान होत आहे. त्यामुळे संघटन वाढत असून आगामी काळात देशभरातील उद्योजकांची वेगळी नोंदणी केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी राष्ट्रीय संघटन महासचिव राजकुमार सैनी, कोर कमिटीचे चेअरमन दिनेश सैनी, राष्ट्रीय युवा अध्यक्ष प्रदीप सैनी, राष्ट्रीय महिला अध्यक्ष श्रीमती कमलेश बेह्ल सैनी, वरिष्ठ उपाध्यक्ष ताराचंद गेहलोत यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरवातीला ऑल इंडिया सैनी (माळी) संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विजय राऊत यांनी महाराष्ट्रातील संघटनेच्या विस्ताराबाबत माहिती दिली.



# शालेय जीवनात मुलांना आपत्ती व्यवस्थापन शिक्षण गरजेचे- जगताप

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक येथील रासबिहारी आंतरराष्ट्रीय इंग्लिश मीडियम या शाळेत शक्ती विकास संस्थेच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन आणि प्रथमोपचार, आग नियंत्रण, विमोचन आदी विषयावर मॉक ड्रिल घेण्यात आले. याप्रसंगी शक्ती का संस्थेचे अध्यक्ष मनोहर जगताप यांनी इयत्ता सहावी ते नववी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेत अचानक आलेल्या आपत्तीवर किंवा अचानक लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्या अगोदर विद्यार्थी आपला या आपत्तीमधून प्राण कशा पद्धतीने वाचवू शकतात याचं प्रात्यक्षिक सादर करण्यात आले .

तसेच जगताप यांनी विद्यार्थ्यांना या आपत्ती काळात आपण स्वतःला कसे वाचवू शकतो याचे विमोचन प्रथमोपचार तसेच मानवाच्या दैनंदिन जीवनात होणाऱ्या बदल याविषयी प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले. या प्रशिक्षणात एकूण ४०० विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मनोहर जगताप यांनी प्रत्येक शाळेत अशा प्रकारचे प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे ही काळाची गरज झाली असून जास्तीत जास्त शाळांनी याबाबत विचार करावा. शालेय जीवनात मुलांना आपत्ती व्यवस्थापन शिक्षण गरजेचे अशी माहिती दिली. यावेळी संस्थेचे बाळासाहेब सूर्यवंशी, अजय जाधव तसेच शाळेच्या प्राचार्य बिंदू विजयकुमार, सोनाली चॅटर्जी, सोनिया तिवारी, दिव्या जाधव, संदीप होळकर आदी उपस्थित होते.

IN THE COURT OF THE COMMISSIONER FOR WORKMEN'S COMPENSATION,
IN THE JUDGE, LABOUR COURT AT DHULE.
APPLICATION (ECA) No.47/2023

श्रीमती भारती ज्ञानेश्वर दोरीक व इतर३ ... **अर्जदार**
**विरूध्द**
सुनिल राजेंद्र पावरा व इतर २ ... **जाबदेणार**

**जाहीर नोटीस**

प्रति,
सुनिल राजेंद्र पावरा, रा.मु.पो.बोरकुंड, ता.जि.धुळे ... **जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार श्रीमती भारती ज्ञानेश्वर दोरीक व इतर, रा. बलकुवा,
ता. शिरपुर, जि. धुळे यांनी मे. कामगार आयुक्त तथा कामगार न्यायाधिश सो. यांचे ईसीए क्र.४७/२०२३ अन्वये प्रस्तुतचा कामगार नुकसान भरपाई अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी सदर कामगार नुकसान भरपाई अर्जात नोटीस पाठवुनही सा.वाला क्र १ श्री सुनिल राजेंद्र पावरा हे हजर झालेले नाहीत अथवा जाणुनबुजुन नोटीस घेण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्याअर्थी या जाहिर नोटीसी अन्वये त्यांना कळविण्यात येते की, सदर ईसीए क्र.४७/२०२३ यात धुळे येथील कामगार आयुक्त तथा कामगार न्यायाधिश सो. यांच्या न्यायालयासमोर दि.१८/०१/२०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता स्वतः किंवा अधिकारपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती अथवा वकीलांमार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, खुलासा, कैफियत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरुपात म्हणणे, खुलासा, कैफियत मे. कामगार आयुक्त तथा कामगार न्यायाधिश सो. यांचे समोर चालविण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस कोर्टाचे सहि शिक्यानिशी आज दि.०४/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे. आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**
**न्यायालय अधिक्षक** **कामगार न्यायालय धुळे**

**अॅड. एम. व्ही. घरटे**
**निशाणी क्र.-६**

**धुळे येथिल मे.४ थे सह दिवाणी न्यायाधिश सो., (क.स्त.) यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं. ३१/२०२४**

१. श्री. प्रकाश रतनसिंग गिरासे उ.व.-३८, धंदा-व्यापार,
रा. सुभाष चौक, लामकानी, ता. जि. धुळे.
२. सौ. अरुणाबाई शंकर गिरासे उ.व.-५१, धंदा-गृहीणी,
रा. मु. पो. शहादे, मोहिदे जि. नंदुरबार. ... **अर्जदार**
**विरूध्द**
कै. लटकनबाई रतनसिंग राजपुत (सासरचे नांव )
उर्फ लाडकोरबाई भ्र. भाया रजपुत (माहेरचे नांव)
मयताचा पत्ता प्रार्थमिक आरोग्य केंद्र, लामकानी, ता. जि. धुळे.
मृत्यु दिनांक : २१/०६/२०१९ ...... **मयत**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

१. अर्जदार क्र. १ व २ यांनी ते मयत कै. लटकनबाई रतनसिंग राजपुत उर्फ लाडकोरबाई भ्र. भाया रजपुत यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाकामी कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी दिनांक : २१/०२/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आपण स्वतः अथवा आपल्या वकीलांमार्फेत हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.

३. उक्त दिवशी व वेळी कोणी हजर न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन पुढील आदेश पारीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहीनिशी आज दि.०६/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : ०६/०१/२०२४ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**
**अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

# भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आज नाशिक दौऱ्यावर

### सामाजिक व संघटनात्मक बैठकांना लावणार उपस्थिती

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे आक मंगळवार दि. ९ जानेवारी रोजी नाशिक दौऱ्यावर येत असून ते येथे विविध सामजिक व भाजपाच्या संघटनात्मक कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या या प्रवासात भाजपाचे सर्व प्रमुख लोकप्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

दुपारी २ वाहता लंडन पॅलेस हॉल, आडगांव नाका येथे ते नाशिक व दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील सुपर बुथ वॉरियर्स बैठकीत उपस्थित राहून ते मार्गदर्शन करणार आहेत. तर सायंकाळी ४ वाहता एनडी पटेल रोड येथील भाजपा वसंतस्मृती कार्यालयात पक्ष प्रवेश कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील.

यासोबतच सकाळी ११ वाहता पंचवटी येथील काळाराम मंदिरात प्रभू श्री राम महाआरती कार्यक्रमास उपस्थित राहतील व सायंकाळी ६.३० वाजता सटाणा तालुक्यातील श्री क्षेत्र केरसाणे येथे महन्महिम कृष्णाई प्रतिष्ठान श्री क्षेत्र जायखेडाच्या वतीने आयोजित 'फिरता नारळीय' सुवर्ण महोत्सव कार्यक्रमाला उपस्थित राहतील.



**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाशिक येथे स्वागत करतांना पालकमंत्री दादाजी भुसे, शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, भाऊलाल तांबडे, महानगर प्रमुख प्रविण तिदमे, गणेश कदम, योगेश बेलदार, रोशन शिंदे आदी.**

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक महोत्सव हे महत्वाचे व्यासपीठ - अॅड. ठाकरे





### मविप्र सांस्कृतिक महोत्सवाचे दिमाखात उदघाटन

**नाशिक । प्रतिनिधी**

शालेय जीवनात अभ्यासासोबतच गायन, वादन, नाट्य, हस्तकला, चित्रकला यांसारख्या विविध कला आत्मसात कराव्यात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक महोत्सव हे महत्वाचे व्यासपीठ आहे असे प्रतिपादन मविप्र संस्थेचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे यांनी केले. ते मविप्र संस्थेच्या सांस्कृतिक महोत्सव जिल्हास्तरीय स्पर्धांच्या उदघाटनप्रसंगी संस्थेच्या कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृहात बोलत होते.

अॅड.नितीन ठाकरे यांच्या हस्ते सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष विश्वास मोरे, संचालक ड.संदीप गुळवे, संचालक लक्ष्मण लांडगे, सेवक संचालक सी.डी. शिंदे, परीक्षक श्रीकांत बेणी, सुनील देशपांडे, मिलिंद गांधी, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, प्रा. दौलत जाधव, मुख्याध्यापिका कल्पना वारुंगसे उपस्थित होते.

अॅड.नितीन ठाकरे यांनी पुढे बोलतांना विद्यार्थी जीवनात शालेय जीवन हे अत्यंत महत्वाचे असून या काळात होणारे संस्कार हे आयुष्यभराची शिदोरी ठरतात. या काळात वक्तृत्व स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्याने सभाधीटपणा येतो. विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतल्याने वैज्ञानिक दृष्टीकोन तयार होतो. यासाठी शिक्षकांनी शहर तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. संस्थेच्या माध्यमातून मविप्र मॅरेथॉन पुन्हा जोमाने घेण्यात येणार असून ७५ हजार पुस्तकांपासून शिवरायांची विश्वविक्रमी ग्रंथरांगोळी साकारण्यात आल्याचे ठाकरे यांनी सांगितले.

सांस्कृतिक महोत्सवात 'चला-चला उधळूया पिवळा भंडार, जेजुरीच्या गडावर शिव मल्हार, हि मायभूमी- हि कर्मभूमी- हि मायमराठी आमुची ' आदी समुहगीते सादर करण्यात आली. यावेळी एकूण ३० संघांनी आपला सहभाग नोंदवत अतिशय उत्तम पध्दतीने सादरीकरण केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्रीकांत बेणी, सुनील देशपांडे, मिलिंद गांधी यांनी कामकाज पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके यांनी मुलांचे व्यक्तिमत्व सर्वांगाने परिपूर्ण व्हावे या उद्देशाने सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून कलागुण सादर करण्याची संधी संस्थेच्या वतीने देण्यात आल्याचे सांगितले. यावेळी पंडित भवानी शंकर यांना संगीतमय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सूत्रसंचालन सविता जाधव, सविता आहेर यांनी केले. आभार शिक्षणाधिकारी प्रा. दौलत जाधव यांनी मानले. स्टेज सजावट जगदीश डिंगे, केशव खताळे, सोमेश्वर मुळाणे, मिलिंद पाटील, देवदत्त राऊत, कमलाकर शेवाळे यांनी केले. तसेच म.वि.प्र.समाज सांस्कृतिक प्रमुख प्रशांत महाबळ, दिनकर दांडेकर, आनंद अत्रे, सविता आहेर, अपर्णा देशपांडे व सविता जाधव हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

प्रोसेस पेड
**अॅड. शरद दामोदर पाटील**
**निशाणी क्र.-६**

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज. नं. ४१/२०२४**

१. श्री. संदीप दगा भदाणे,
२. श्री. खेमेश्वर दगा भदाणे,
दोन्ही रा. मंदाणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे.
३. सौ. मनिषा दिलीप पाटील (लग्नानंतरचे नाव)
कु. मनिषा बाप दगा भदाणे (लग्नापुर्वीचे नाव)
रा. श्रीकृष्ण कॉलनी, निमझरी नाका, शिरपुर, ता. शिंदखेडा, जि. धुळे.
४. सौ. वैशाली श्याम पाटील (लग्नानंतरचे नाव)
कु. वैशाली बाप दगा भदाणे (लग्नापुर्वीचे नाव)
रा. कलमाडी, ता. शिंदखेडा, जि. धुळे. ... **अर्जदार**
**विरूध्द**
मा. शाखा प्रबंधक, भारतीय स्टेट बॅक, ... **सामनेवाला**
कै. हिरकणबाई रावण पाटील ...... **मयत**

उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणेसाठी (Succession Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार नं. १ ते ४ यांनी त्यांची आजी मयत हिरकणबाई रावण पाटील यांचे भारतीय स्टेट बॅक शाखा-नवलनगर, धुळे, येथील खाते क्र. ३२८४०८३३६१९ सदर खात्यात रक्कम रुपये १४,२७९/- (अक्षरी रुपये चौदा हजार दोनशे एकोनऐंशी मात्र) व खाते क्र. ११५०५५७७९४८ या खात्यात रक्कम रुपये २,०२३/- (अक्षरी रुपये दोन हजार तेवीस मात्र) सदरच्या दोन्ही खात्यातील रक्कमा मिळणेसाठी भारतीय वारस कायदा कलम ३७२ अन्वये उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क स्तर कोर्ट नं. ६ यांचे कोर्टात दिनांक २७/०२/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत / प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत हिरकणबाई रावण पाटील यांचे कायदेशिर वारस म्हणुन भारतीय वारस कायदा कलम ३७२ अन्वये उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत एकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि. ०६/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे. आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**
**अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

**अॅड.नितीन नगीनचंद चोरडीया, धुळे**
**निशाणी क्र.-६**

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील मे. ५ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर सो यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३२/२०२४**

१. श्री. हेमंत राजेंद्र काकडे वय-२९ वर्ष धंदा-व्यापार
रा. घर न. १६९२ गल्ली नं. ४ बालाजी मंदिर धुळे
२. श्रीमती. पौर्णिमा राजेंद्र काकडे वय ५७ वर्ष धंदा-घरकाम
रा. घर न. १६९२ गल्ली नं.४ बालाजी मंदिर धुळे
३. श्री. ललीत राजेंद्र काकडे वय-३५ वर्ष धंदा-व्यापार
रा. आग्रा रोड बॉम्बे लॉज जवळ धुळे
४. श्री. अमित राजेंद्र काकडे वय ३२ वर्ष धंदा-व्यापार
रा. घर न. १६९२ गल्ली नं. ४ बालाजी मंदिर धुळे
५. श्री. महेश बालाप्रसाद काकडे वय-३२ वर्ष धंदा-व्यापार
रा. घर न. १६९२/२ गल्ली नं. ४ बालाजी मंदिर धुळे ... **अर्जदार**
**विरूध्द**
**कोणीही नाही** ... **जाबदेणार**
कै. विष्णुप्रसाद रामनारायण (मयत)
रा. घर न. १६९२ गल्ली नं. ४ बालाजी मंदिर धुळे ...... **मयत**

अर्जदार तर्फे मे. कोर्टास विंनती अर्ज की,

ज्याअर्थी की, अर्जदार हे कै. विष्णुप्रसाद रामनारायण (मयत) यांचे अर्जदार नं.१,३ व ४ पणतु आहे. अर्जदार नं. २ ही नात सुन आहे. अर्जदार नं. ५ हे नातु आहे. कै. विष्णुप्रसाद रामनारायण हे मौजे धुळे ता.जि. धुळे येथे निधन झालेले आहे. कै. विष्णुप्रसाद रामनारायण यांचे अर्जदार नं. १ ते ५ वारस आहेत. तशी त्यांना वारस दाखल्याचे नितांत तातडीची गरज आहे. त्यामुळे अर्जदार हिने बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये हे हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी सदर अर्जाचे कामकाज दि. २१/०२/२४ रोजी मे. कोर्टात चौकशी कामी नेमलेले आहे.

ज्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी वा वकीलामार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे, नाही, हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दिनांक. ०५/०१/२४ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**
**अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

# मराठा समाजाच्या लढ्यात जे लोकप्रतिनिधी सहभागी होणार नाहीत त्यांना आगामी निवडणुकीत समाज शिकवणार धडा

## न्यूज कॉलम

### देऊर येथे बाल आनंद मेळावा उत्साहात

**नाशिक ।** देऊर (ता. धुळे) येथील कॅप्टन विश्र्वासराव देवरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बाल आनंद मेळावा नुकताच घेण्यात आला. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ बनवून आणले होते. भारत स्काऊट गाईड अंतर्गत स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनं मार्फत बाल आनंद मेळावा आयोजित या मेळाव्याचे करण्यात येतो. उद्घाटन ग्रामसेवक मंडळाचे अध्यक्ष तथा धुळे पंचायत समिती सदस्य विश्र्वासराव नानासाहेब देवरे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डी. एस. देसले उपस्थित होते. स्काऊट विभाग प्रमुख एम. एम. भामरे यांनी स्काऊटचे महत्त्व पटवून दिले. स्काऊट गाईडच्या कब बुलबुल पथकाने विविध खाद्यपदार्थ यावेळी तयार केले.

### वक्तृत्व स्पर्धेत लीना शिंदे यांचे यश

**सिन्नर ।** इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानतर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत झेड.बी. पाटील कनिष्ठ महाविद्यालयाची लीना सुरेश शिंदे हिने उत्तेजनार्थ बक्षीस मिळविले. तसेच राजनंदिनी प्रवीण माळी हिने पारोळा येथे झालेल्या छत्रपती राजे संभाजी खान्देशस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले आहे.

---

**मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक करण गायकर यांचा इशारा**

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



सकल मराठा समाजाच्या वतीने मालेगाव येथे सकाळी अकरा वाजता शासकीय विश्रामगृह व चांदवड तालुक्यातील बैठक शासकीय विश्रामगृह या ठिकाणी संपन्न झाली. या बैठकीसाठी करण गायकर, चंद्रकांत बनकर, नानासाहेब बच्छाव, कैलास खांडबहाले, सुभाष गायकर, वैभव दळवी, कल्पेश पाटील, नीलेश ठुबे ज्ञानेश्र्वर कवडे आदींसह समाजबांधव नासिकवरून उपस्थित होते.

यावेळी मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक करण गायकर यांनी बैठकीमध्ये दि. २४ जानेवारी रोजी मुंबई येथील आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील मराठा बांधवांनी जास्तीत-जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले. मराठा योद्धा जरांगे पाटील यांनी उभा केलेला हा लढा गरीब मराठ्यांसाठी असल्याने सर्व मराठ्यांनी या आंदोलनाला ताकद द्यावी. मराठा समाजातील जे लोकप्रतिनिधी या लढ्यात सहभागी होणार नाही त्यांना येणाऱ्या निवडणुकीमध्ये मराठा समाज त्यांची जागा दाखवल्याशिवाय शांत बसणार नाही. तुम्हाला जर ओबीसीच्या मताचा धाक असेल तर मराठ्यांचीही मत तुम्हाला येणाऱ्या निवडणुकीत मिळणार नाहीत. मराठा समाजाची मते मिळवायचे असेल तर या आंदोलनामध्ये तुम्ही सहकुटुंब आपआपली शिदोरी सोबत घेऊन या. आंदोलनात सक्रिय सहभागी व्हावे. तसेच तालुक्यातील मराठा समाज बांधवांच्या घरोघरी जावून कालपासून जनजागृती करत मुंबई येथे सर्वांनी येण्याचे निमंत्रण द्यावे. हा अंतिम लढा असून या लढ्यामध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळेलच आणि हे सत्य आहे. आता आरक्षण मिळूनच आपण घरी येणार आहोत, हा संकल्प करूनच मुंबईला सर्व मराठा समाजाने येण्याचे आवाहन केले.

त्याचप्रमाणे मराठा नेते चंद्रकांत बनकर यांनी सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्रातून जे मराठा बांधव आंदोलनात सहभागी होणार आहे. त्यांच्या भोजन व्यवस्थेसाठी आपल्याला आपल्या जिल्ह्यातून धान्य, तांदूळ, तेल, शेंगदाणे, डाळ यांसह अन्य लागणारी अन्न सामग्री आपल्या तालुक्यातील गण, गट व तालुक्याच्या ठिकाणी जमा करावे. तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी आर्थिक मदत करणार असतील ती त्यांनी सकल मराठा समाजाच्या नावाने कार्यान्वित करण्यात येणाऱ्या बँक खात्यामध्ये क्यूआर कोडच्या माध्यमातून ऑनलाइन जमा करावे असे आवाहन केले.

सदरची लढाई ही शेवटची असल्याने येणाऱ्या पुढील पिढीसाठी गरजेची असल्याने प्रत्येक घरातील समाज बांधवांनी मुंबई येथे जाण्यासाठी सज्ज रहावे. याप्रसंगी मालेगाव तालुक्यातील अमोल निकम, गिरीश बोरसे, तुषार जगताप, निंबा निकम, मंगेश निकम, संजय वहावळ, माधवी पाटील, मनीषा अहिरे, दिनेश पाटील, प्रतिभा हिरे, किरण पाटील, प्रदीप पाटील, करण भोसले, पंकज हिरे, पवन हिरे, राकेश भुसे, क्रांती पाटील, भरत पाटील, गिरीश बोरसे, दादाजी हिरे, नितीन पाटील, निकेतन बच्छाव आदी समाज बांधव उपस्थित होते. चांदवड तालुक्यामध्ये दत्ता गांगुर्डे, संजय जाधव, अनिल कोतवाल, पप्पू कोतवाल, दीपक हांडगे, नवनाथ आहेर, तेजस नवले, गौरव देशमाने, बाळासाहेब गाडे, प्रकाश शेळके, धमाजी सोनवणे, सनी कोतवाल, भाऊसाहेब वाघ, योगेश देशमाने, निलेश ढगे, महेश ठाकरे, संजय जाधव आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गुरुशिष्य स्मारक येथे माजी महापौरांनी स्व:खर्चाने बसविले लोखंडी जिने

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहरातील गुरुशिष्य स्मारक येथे माजी महापौर प्रतिभा चौधरी यांनी स्वःखर्चाने दोन लोखंडी जीने बसविले. त्याचे लोकार्पण आज संत शिरोमणि संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रथम महापौर भगवान करनकाळ व माजी महापौर प्रतिभा चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी रघुनाथ चौधरी, पितांबर महाले, नगरसेवक नरेश चौधरी,माजी सरपंच भटू चौधरी, युवराज चौधरी, रामेश्वर चौधरी, योगेंद्र थोरात, खान्देश तेली पंच मंडळ अध्यक्ष कैलास चौधरी, चंद्रकांत चौधरी, मनोज चौधरी, श्याम चौधरी, दत्तात्रय चौधरी, प्रमोद चौधरी, प्रा.सागर चौधरी, रितेश चौधरी, प्रसाद अहिरराव, मनोज चिलंदे, भूषण चौधरी, योगेश चौधरी, महिला मंडळाचे अलका चौधरी, सुमन महाले, सौ.आरती महाले, दीपिका चौधरी, स्मिता पाटील, आशा चौधरी आदी उपस्थित होते. माजी महापौर प्रतिभा चौधरी यांनी सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून केलेल्या या कार्यामुळे त्यांचे समाज बांधवांकडून कौतूक करण्यात आले. अनेक वर्षांपासून चढण्यासाठी व उतरण्यासाठी जिना किंवा पायर्या नव्हत्या. त्यामुळे समारकाच्या ठिकाणी जयंती किवा पुण्यथितीला मोठी अडचण निर्माण होत होती. ही बाब लक्षात घेवून व खान्देश तेली मंडळ आणि तेली समाज महिला मंडळ यांच्या मागणीनुसार माजी महापौर सौ. चौधरी यांनी स्वःखर्चाने दोन लोखंडी जिने बसवून घेतले.


---

## भडने येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**चिमठाणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथील धुळे जिल्हा माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष व माजी सरपंच पांडुरंग पुना माळी यांच्या राहत्या घरी सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी न्याहाळोद येथील विकास सोसायटीचे चेअरमन माळी यांनी प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार



घातला. यावेळी माळी महासंघाचे पदाधिकारी व समता परिषदेचे युवा जिल्हाध्यक्ष योगेश पांडुरंग माळी, भडणे येथील आदर्श पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील युवराज माळी, खुशाल माळी, माजी ग्रामपंचायत सदस्य भावराव कोळी, मोहन माळी, जगदीश माळी, शुभम माळी, विठोबा माळी, राजेंद्र माळी आदी मान्यवर उपस्थित होते.

## दीड वर्षाचा बिबट्या अडकला पिंजऱ्यात

**धुळे ।** शहरातील पाईप पुलाजवळ असलेल्या कालिका माता व हनुमान मंदिराच्या मधोमध असलेल्या रस्त्यावर नेहमी वाहतुकीची वर्दळ असते. याठिकाणी नेहमीच अपघातही होत असतात. अपघात टाळण्यासाठी या रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी आहे.

## दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त साक्रीत प्रतिमा पूजन

**साक्री । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मराठी पत्रकार दिन वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आठवण म्हणून ६ जानेवारी हा दिवस राज्यात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. याच अनुषंगाने साक्री तालुका जन ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने साक्री येथील क्लासिक फोटो स्टुडिओ येथे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत



आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून साक्रीचे पोलीस उपनिरीक्षक प्रसाद रौंदळ, तुषार जाधव, प्रेस क्लबचे संस्थापक आबासाहेब सोनवणे, जगदीश शिंदे, जन ग्रामीण पत्रकार संघाचे धुळे जिल्हा सल्लागार जी टी मोहिते, धुळे जिल्हा संघटक विद्यानंद पाटील, पत्रकार राजेंद्र वाघ, डॉ. प्रा. कैलास वाघ आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन जन ग्रामीण पत्रकार संघाचे शहर अध्यक्ष प्रकाश वाघ, उपाध्यक्ष अखिल शहा, शहराध्यक्ष जितेंद्र जगदाळे, उपाध्यक्ष संघपाल मोरे, पत्रकार हरीश मंडलिक, पत्रकार चंद्रकांत अहिराव आदींनी केले होते.

---

## अहिल्यापूर विद्यालयाच्या वतीने स्वच्छता व जनजागृती दिंडीचे आयोजन

**वरूळ । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शिरपूर तालुक्यातील अहिल्यापूर येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयाच्या वतीने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम अंतर्गत गावाने शाळेत यावे व शाळेने गावात जावे अशी मोहीम हाती घेतलेली आहे. गावातील पालकांचाही स्वच्छता मोहिमेत आणि मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात सहभागी व्हावा म्हणून अहिल्यापूर गावात जनजागृती पर स्वच्छता दिंडी काढण्यात आली.




या स्वच्छता दिंडीला अहिल्यापूर गावाचे सरपंच संग्रामसिंग राजपूत यांनी ग्रामस्थ पालक शिक्षक संघ शालेय व्यवस्थापन समिती सदस्य आणि मुख्याध्यापक पी. एन. गोसावी यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. अहिल्यापूर गावात विद्यार्थ्यांमार्फत स्वच्छतेचे विविध संदेश देण्यात आले. तसेच गावातील ग्रामपंचायत व महादेव मंदिराच्या चौकात विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ केला. तत्पूर्वी ऐतिहासिक वारसा जतन व्हावा विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी म्हणून अहिल्यादेवी होळकर यांच्या ऐतिहासिक विहिरीची स्वच्छता करून तेथील झाडे झुडपे काढून परिसर स्वच्छ आणि सुंदर करण्यात आला. या दिंडीचे आयोजन विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक आर एम जाधव व्ही.डि.कढरे, एस.पी. महाजन, ए. एस. गिरासे, टी. यु. कुरेशी, बी.ओ. वाघ डी.व्ही. जावरे, पी. एन. मोरे , डॉ. एस. एन. पाटील यांनी केले.

## ग्लोबल इंटरनॅशनल स्कूलच्या शाखा क्रमांक एकमध्ये सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल शाखा क्रमांक एकच्या शाळेच्या प्रांगणात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत विद्यार्थिनी आल्या होत्या. तर काही विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले




यांच्यावर याप्रसंगी भाषणे केली.

संस्थेचे अध्यक्ष अध्यक्ष केन सर यांनीही सावित्रीबाई फुले यांच्यावर भाषण केले. मुख्याध्यापिका प्रतिभा यांनी सावित्रीबाई फुले यांच्यावर भाषण केले.

---

## कालिका माता मंदिरात वार्षिक दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा संपन्न

**चिमठाणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

चिमठाणे येथे कालिका माता मंदिरात सालाबादा नुसार यावर्षी दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा हा महाराष्ट्रातून प्रत्येक कालिका माता मंदिरात हा सोहळा कासार समाज ट्रस्ट मार्फत आयोजित करण्यात येतो.

चिमठाणे कासार समाज अध्यक्ष पुष्पाबाई शामराव



कोळपकर यांनी सर्व कासार समाज बांधव आणि भगिनीच्या शुभ हस्तेदिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमासाठी समाज बांधव आणि भगिणींनी परिश्रम घेतले अशी माहिती महेश शामराव कोळपकर यांनी दिली.

## शिंदखेडा येथे पत्रकारदिन साजरा

**शिंदखेडा ।** धुळे । आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त श्रीजी अभ्यासिकेतर्फे पत्रकारदिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी विकासो चेअरमन, ज्येष्ठ नागरिक डी. टी. चौधरी होते. पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणार्या २१ जणांचा सत्कार झाला. त्यात प्रा. दीपक माळी, प्रा. अजय बोरदे, प्रा. सतीश पाटील, परेश शहा, जितेंद्र मेखे, भिका पाटील, पीक संरक्षण सोसायटी चेअरमन विजय चौधरी, राजेंद्र मराठे यांचा समावेश होता. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विजय चौधरी, राजेंद्र मराठे, सागर चौधरी व अभ्यासिकेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## मराठी पत्रकार दिनानिमित्त मोफत नेत्र तपासणी

**पिंपळनेर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

येथील नेहा व्हिजन अँड कॉन्टॅक्ट लेन्स व श्री साई शैक्षणिक संस्था मर्यादित पिंपळनेर व श्री मेडिकल व नितीन येवले यांच्या वतीने पिंपळनेर येथील पत्रकारांचे नेत्र तपासणी व मोफत चष्मे व औषधें वाटप करण्यात आले.

बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ.अरूण ओझरकर यांनी केले. त्यानंतर प्रत्येक पत्रकाराचे नेत्र तपासणी करून औषधी व चष्मे देण्यात आले. यावेळी पिंपळनेर तालुका पत्रकार



संघाचे अध्यक्ष सुभाष जगताप यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की डॉ अरुण ओझरकर यांचे वडील वामनराव ओझरकर हे पिंपळनेर शहरातील प्रथम पत्रकार होते त्यांनी जो उपक्रम राबविला म्हणून त्यांचे विशेष अभिनंदन केले व धन्यवाद दिले. डॉ अरुण ओझरकर यांनी नेत्र तापसणी केली व सर्व पत्रकारांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला तर प्रकाश गोगड,नितीन येवले यांनी औषधी उपलब्ध करून दिले.

यावेळी प्रा शिवप्रसाद शेवाळे, राजेंद्र गवळी, विशाल गांगुर्डे, भरत बागुल, विशाल बेनुसकर, अंबादास बेनुसकर,जगदीश ओझरकर,चंद्रकांत घरटे,दिलीप बोळे, अनिल बोराडे उपस्थित होते. मनोगत प्रा एस डी पाटील यांनी केले तर विशाल बेनुसकर यांनी आभार व्यक्त केले.

---

## पावणेदोन लाखांचा नायलॉन मांजा जप्त; दोघांना अटक

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये नायलॉन मांजा विक्री व वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच विक्री करणाऱ्यावर तडीपारीची कारवाईदेखील सुरू आहे. असे असतानाही शहर गुन्हेशाखेच्या युनिट एकच्या पथकाने दोघांना ताब्यात घेत त्यांच्याकडून १ लाख ७२ हजारांचा २१५ नायलॉन मांजाचे गट्टू जप्त केले आहेत. याप्रकरणी मुंबई नाका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी अधिसूचना जारी करीत शहर आयुक्तालय हद्दीमध्ये नायलॉन मांजा विक्री व वापरावर बंदी घातलेली आहे. तसेच, आत्तापर्यंत केलेल्या कारवाईतील ४२ जणांना वीस दिवसांसाठी तडीपारही करण्यात आले आहे. असे असतानाही, शहरात चोरीछुप्यारितीने नायलॉन मांजाची विक्री सुरू आहे. पतंगबाजीत नायलॉन मांजाचा होणारा



वापर मानवी जिवितास धोका निर्माण करणारा आहे. याशिवाय पशु-पक्ष्यांच्या जीवाला बेतणारा आहे. या पार्श्र्वभूमीवर, नायलॉन मांजा विक्रीवर पोलिसांनी बंदी आणली आहे. स्थानिक गुन्हे शाखा एकच्या पथकाला मुंबई नाका येथील विहार सोसायरी प्रवेशद्वाराजवळील चहाच्या टपरीजवळ नायलॉन मांजाची विक्री होत असल्याची माहिती मिळाली. युनिट एकचे अंमलदार नितीन जगताप, विलास चारोस्कर यांना मुंबई नाका परिसरामध्ये नायलॉन मांजा विक्री करण्यासाठी संशयित येणार असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार, पोलिसांनी बजाज शोरुमच्या पाठीमागे असलेल्या हरिविहार सोसायटीजवळ असलेल्या चहाच्या टपरी येथे आलेल्या संशयित अरबाज फिरोज शेख (२४, रा. भद्रकाली, जुने नाशिक) यास अटक केली. त्याच्याकडून १ लाख ७२ हजार रुपयांचे नायलॉन मांजाचे २१५ गट्टू जप्त केले. मोनो फाईटर, मोनो काईट, गो इंडिया गो कंपनीचे नायलॉन मांजाचे गट्टू होते. सदरचा नायलॉन मांजा संशयित शेख याने मुंबईतील अहमद हुसून जहीद काझी (रा. बांद्रा, मुंबई) याच्याकडून आणल्याचे सांगितले. याप्रकरणी मुंबई नाका पोलिसात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित शेख याच्यावर यापूर्वीही अंबड पोलिसात नायलॉन मांजा विक्री करताना आढळून आल्याने गुन्हा दाखल आहे. सदरची कामगिरी युनिट एकचे पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, मिलिंद परदेशी, राजेश राठोड, राहुल पालखेडे, नितीन जगताप, विलास चारोस्कर यांनी बजावली.

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर परिसंवादाचे आयोजन

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

येथील आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यावर एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन बुधवार १० जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले आहे. उच्च शिक्षणात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे आमुलाग्र बदल होणार असून सदर बदलांविषयी विद्यार्थी आणि पालक यांना सविस्तर माहिती व्हावी या हेतूने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ मार्फत आर.सी.पटेल महाविद्यालयाने या परिसंवादाचे आयोजन केले आहे.

या परिसंवादात शिरपूर येथील एस.पी.डी.एम. महाविद्यालयाचे प्राचार्य व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील शास्त्र व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एस.एस.राजपूत मार्गदर्शन करणार आहेत. या परिसंवादात महाविद्यालयीन विद्यार्थांसोबत परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक देखील सहभागी होणार आहेत. या परिसंवादाचे आयोजन प्राचार्य डॉ.डी.आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.ए.जी. सोनवणे, महाविद्यालयीन आय. क्यु.ए.सी. करत आहे. या परिसंवादाचा लाभ विद्यार्थी आणि पालकांनी घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील यांनी केले आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
मंगळवार दि. ९ जानेवारी २०२४





# रसिक असेपर्यंत नाटक संपणार नाही : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचा समारोप















पिंपरी । समाजातील मराठी नाट्यरसिक असेपर्यंत मराठी नाटक संपणार नाही. त्यामुळे मराठी नाटक टिकेल की नाही याची चिंता करू नका. मुकपट, बोलपट, टीव्ही, ओटीटी प्लॅटफॉर्म आल्यानंतरही नाटक संपलेले नाही. नाट्य चळवळीसाठी आवश्यक पाठबळ राज्य सरकारकडून दिले जाईल. सध्या लोककला केवळ शोकेससाठी वापरतो, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे लोककलांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र कार्यक्रम तयार केला जाईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने पिंपरी-चिंचवड येथे आयोजित शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या समारोप प्रसंगी फडणवीस बोलत होते. त्या प्रसंगी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, लेखक प्रा. मिलिंद जोशी, आमदार महेश लांडगे, उमा खापरे, आयुक्त शेखर सिंह, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, नाट्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, उद्योजक राजेश सांकला, कृष्णकुमार गोयल आदी उपस्थित होते. कार्यक्रमात मधु जोशी, वसंत अवसरीकर यांच्यासह २५ कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक



# शंभराव्या नाट्य संमेलन सोहळ्याची दमदार सांगता

## नाटके, एकांकिका पाहण्यासाठी तरुणाईची गर्दी













पिंपरी ।
गणाधीशा.., राधा ही बावरी.., मधूबाला, काय सांगू राणी मला गाव सुटना अशी एकाहून एक बहारदार गाणी. अवधूत गुप्ते आणि त्यांची सहकार्यांचे सुरेल सादरीकरण याने शंभराव्या नाट्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याची सांगता अविस्मरणीय ठरली. अभिनेता, दिग्दर्शक, लेखक, गीतकार, संगीतकार आणि पार्श्र्वगायक अवधूत गुप्ते यांनी 'गणाधीश' या गाण्यातून श्री गणरायाला वंदन करत आपल्या गायनाची सुरुवात केली. पुढे त्यांचे गाजलेले 'तुझे देख के मेरी मधूबाला', 'सखे तुझ्या नावाचं गं वेड लागल' हे गीत सादर करत वातावरणात जोश निर्माण केला. त्यांनी काय सांगू राणी मला गाव सुटना .... म्हणताच पिंपरी - चिंचवडकरांनी एकाच जल्लोष करत त्यांना उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी अभिनेता प्रतीक लाड, गौरव मोरे, अभिनेत्री जुई आणि दिग्दर्शक विशाल देवरुखकर यांनी स्टेजवर एन्ट्री करत गाण्यात रंगत भरली. पुढे अवधूत आणि मुग्धा यांनी 'उन उन व्हाटातून' हे गाणे सादर करत रात्रीच्या थंडीला गुलाबी थंडीत परिवर्तीत केले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या बहारदार संगीत रजनीचे निवेदन अभिनेता पुष्कर श्रोत्री याने केले.